प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय.
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर, पहिला माळा, बी विंग, वनभवन, सिव्हील लाईन्स, नागपूर - ४४० ००१,
दूरध्वनी क्र.(०७१२) २५३०१६६, २५५६९१६ फॅक्स क्र. (०७१२) २५५०६७५ ई मेल- apccfnodal@mahaforest.gov.in

विषय:- वनजमिन-ठाणे

वन (संवर्धन) अधिनियम-१९८० अंतर्गत अल्याणी लघु पाटबंधारे योजना ता. मुरबार, जिल्हा ठाणे क्षेत्र ३२.३५७७ हे. वनजमिन वळतेकरण्याबाबतचा प्रस्ताव

क्रमांक : कक्ष-१७/नोडल/ठाणे/आयडी-१२७२४ (६८)/ 670 /२१-२२
नागपूर - ४४० ००१, दिनांक : 30/07/2021

प्रती,

मुख्य वनसंरक्षक (प्रा),
ठाणे

संदर्भ:- १) या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१७/नोसेल/आरएस-२/आयडी-१२७२४/१२६६, दिनांक २५/०२/२०२१
२) आपले पत्र क्रमांक कक्ष-१०/वसं/प्र.क्र.६५/१६६, दिनांक १९/०७/२०२१

उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक १ अन्वये अल्याणी लघु पाटबंधारे योजना ता. मुरबार, जिल्हा ठाणे क्षेत्र ३२.३५७७ हे. वनजमिन वळतेकरण्याबाबतचा प्रस्तावास १ ते ६ त्रुटींची पूर्तता करण्यास आपणास कळविण्यात आले होते त्यानूषंगाने आपले कडील पत्र क्रमांक २ अन्वये त्रुटी पूर्तता अहवाल या कार्यालयास सादर करण्यात आला. सदर प्रस्तावाच्या प्रस्तावित KML file व online parivesh portal व प्रस्तावाची तपासणी केली असता खालील प्रमाणेच्या त्रुटी निदर्शनास येतात-

१. प्रस्तावित प्रकल्पाची KML file प्रस्तावाच्या Area Staement मध्ये नमूद Component/Item wise break-up गावांचे नाव, सर्व्हे क्रमांक, लांबी व रूंदी व क्षेत्र नूसार दिसून येत नाही. तसेच सदरहू KML file वर प्रत्येक Component/Item wise break up, गावांचे नाव, सर्व्हे क्रमांक, लांबी व रूंदी व क्षेत्र Properties दर्शविण्यात यावी. सुधारीत प्रस्तावित क्षेत्राची KML file ३ प्रती C.D मध्ये या कार्यालयात सादर करण्यात यावी व Parivesh portal वर सूध्दा upload करण्यात यावी.
२. विभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद यांनी पर्यायी वनीकरणासाठी निवड केलेली जमीन गाव जागजी, गट क्रमांक क्र.३०८, क्षेत्र २०.०० हे. व गाव निलेगाव तालुका.तुळजापूर गट क्रमांक १७६, क्षेत्र १२.३६ क्षेत्र जिल्हा उस्मानाबाद क्षेत्राची KML file त्यावर properties दर्शवून C.D. मध्ये सादर करण्यात यावी व Parivesh portal वर सूध्दा upload करण्यात यावी.
३. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी FRA-२००६ अंतर्गत प्रमाणत्र निर्गमित केलेले online Part-I वर upload करण्यात यावे.
४. प्रस्तावित क्षेत्रात उपवनसंरक्षक, ठाणे वनविभाग, ठाणे यांच्या स्थळ निरिक्षण अहवालात होणा-या वृक्षांची तोड ७९७ दर्शविण्यात आलेली आहे परंतू Online Part-II मध्ये होणा-या वृक्षतोडीची संख्या ९४५ दर्शविण्यात आलेली आहे. प्रस्तावात ७९७ वृक्ष तोड होणार आहे असे सुधारीत वृक्ष तोडीचे estimate आपले कडील संदर्भिय पत्र क्रमांक २ अन्वये सादर करण्यात आलेले आहे. परंतू online Part-II मध्ये ७९७ वेढीवार वृक्ष तोडीची संख्या दर्शविण्यात आलेली नाही.
५. पर्यायी वनीकरणाची १० वर्षाची योजना online Part-II वर upload करण्यात आलेली नाही.

तरी आपणास कळविण्यात येते की, वन (संवर्धन) अधिनियम-१९८० अंतर्गत उपरोक्त बाबीची तात्काळ या कार्यालयास पूर्तता करण्यात यावी, जेणेकरून प्रस्तावाचे संस्करण करणे सोईचे होईल.

Noted-

30/7/21

(नरेश झुरमुरे)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी

प्रतिलिपी:- उपवनसंरक्षक, ठाणे वनविभाग, ठाणे यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
प्रतिलिपी:- जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
प्रतिलिपी :- विभागिय वन अधिकारी उस्मानाबाद यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित